दि. १४.०६.२०२३

# प्रेस नोट

**आरोपी भिमराव निलाप्पा चव्हाण, वय ४७ वर्ष, पद – तलाठी, ने. तहसील कार्यालय, निलंगा, सज्जा – केळगाव, ता. निलंगा, हा.मु. बँक कॉलनी, निलंगा, जि.लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक भिमराव निलाप्पा चव्हाण, तलाठी यांनी तक्रारदार व त्यांचा पुतण्या यांचे ताब्यात राठोडा ता. निलंगा या गावात ८० आर कुळाची जमिन आहे. त्या जमिनीच्या अनुपंगाने बक्षिसपत्राच्या आधारे विरोधी पार्टीने फेरफार नोंदवण्यासाठी तलाठयाकडे अर्ज केलेला होता. यातील तक्रारदार व त्यांचा पुतण्या यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविण्याची तलाठयाकडे तक्रार केली असता तक्रारदार यांच्या तक्रारीला तलाठी कार्यालयात ऑनलाईन नोंदवुन तक्रारदारच्या बाजूने अंतीम निर्णय देण्याच्या कामात मदत करण्यासाठी तलाठी भिमराव चव्हाण यांनी ६,०००/– रू. ची लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. १३/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुपंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. १४/०६/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार तलाठी भिमराव चव्हाण यांनी तक्रारदारास पंचासमक्ष ६,०००/– रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३,०००/– रू लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. १४/०६/२०२३ रोजी तक्रारदार हे आलोसे यांच्या खाजगी कार्यालयात, दत्त नगर निलंगा येथे जावुन भेटले असता आलोसे भिमराव निलाप्पा चव्हाण, तलाठी यांनी १३.३४ वा. सुमारास लाचेची रक्कम ३,०००/– रू स्वत: पंचासमक्ष स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहात पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आलोसे भिमराव निलाप्पा चव्हाण, तलाठी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन निलंगा, जि. लातूर, जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तपास भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/रमाकांत चाटे, फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९३०९३४८९८४ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | @anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर
सत्यमेव जयते

Scanned with CamScanner